# स्वातंत्र्य, सत्ता व सत्य

भारत पुन्हा एकदा नव्या वळणावर उभा आहे. एका बाजूला लोकसभा निवडणुकांमध्ये प्रचंड यश मिळवलेल्या विजेत्यांचा उत्सव सुरू आहे; तर दुसऱ्या बाजूला लोकशाहीच्या 'उपस्थिती'मध्येच निर्माण झालेल्या अ-स्वातंत्र्याच्या परिस्थितीमुळे नागरी समाजाच्या स्वातंत्र्यावर गंभीर मर्यादा आल्या आहेत- एकाच वेळी उदात्त व शोकात्म असलेल्या सत्याबाबत विचार करणं आणि या सत्याबाबत संवाद साधणं अवघड होऊन बसलं आहे. सत्त व स्वातंत्र्य यांच्यातील परिवर्तनकारी संबंधांमुळे 'सत्यवचना'च्या शक्यता निश्चित होत असतात, आणि आता या संबंधांनी प्रतिगामी- किंबहुना अंतर्विरोधी वळण घेतलं आहे. ऐतिहासिकदृष्ट्या निम्न वर्गांनी मुक्तीसाठी संघर्ष केला, त्यातून सत्त व स्वातंत्र्य यांचा सौम्य संयोग झाला, परंतु आता या दोन घटकांना एकत्र आणण्याचे प्रयत्न परिवर्तनकारी उद्देशाने होत नसून अनेकवचनी मूल्यव्यवस्थेच्या दमनकारी एकसंधतेसाठी होत आहेत. सर्जनशील कल्पनेच्या बळावर अनेकवचनी भारताचा घडवण्याचं स्वातंत्र्य आता उद्ध्वस्त केलं जातं आहे, आणि त्याच्या जागी भय, द्वेष व दडपशाही अशा आक्रमक प्रेरणा विराजमान होत आहेत. या प्रेरणाच प्रतिगामी अर्थाने सत्याचं सार बनल्या आहेत, त्यामुळे सत्याचीही सक्ती सुरू झाली आहे.

सत्त व स्वातंत्र्य यांनी प्रतिगामी वळण घेतलं की त्यातून मूलतः प्राणघातक मिश्रण तयार होतं, त्यातून असुरक्षित गटांवर विध्वंसक परिणाम साधला जातो. भारतीय समाजातील त्रस्त घटकांविरोधात हिंसाचार करणाऱ्यांना स्वातंत्र्याचा अनुभव मिळतो, एवढंच नव्हे तर अशा असुरक्षित घटकांना गंभीर इजा पोचवल्यामुळे त्यांना सामाजिकदृष्ट्या सत्तधीश बनल्याचीही जाणीव होते. २०१६ साली गुजरातमध्ये उना इथे चार दलित तरुणांना सार्वजनिक ठिकाणी झोडपण्यात आलं, तेव्हाही स्वातंत्र्य व सत्तेचं हे प्राणघातक मिश्रण दिसून आलं. भारतामध्ये अल्पसंख्याक व्यक्तींवर जमावाद्वारे होणारे हिंसक हल्ले निर्धोकपणे सुरूच आहेत. उच्चशैक्षणिक संस्थांमध्ये- विशेषतः वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये दलित व आदिवासी विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची मालिकाच सुरू असून अलीकडेच मुंबईतील एका विख्यात सरकारी रुग्णालयातील दुहेरी वंचित गटातील डॉक्टरनेही दुर्दैवी आत्महत्येचा मार्ग पत्करला. सक्तीच्या सत्याला कृती करण्याचा अवकाश राजकीय सत्तेकडून अनधिकृतरित्या दिला जातो, तेव्हा त्यातून आपोआपच दोन भाग पडतात- ही सत्त टीकाकारांची तत्काळ मुस्कटदाबी करत नाही, पण असुरक्षित घटकांच्या जगणं दुष्कर होऊन जातं. सक्तीच्या सत्याचे काही आविष्कार उपरोल्लेखित उदाहरणांमधून दिसतात. सक्तीद्वारे अंमलात येणारं सत्य लोकशाही मतभिन्नतेबाबत सहिष्णू नसतं. किंबहुना, हे सत्य वादचर्चेला तयारच नसल्यामुळे कोणत्याही युक्तिवादांविषयी आणि विचारविनिमयाविषयी ते सक्रिय तुच्छता दाखवतं. स्वतःच्या अंतरात्म्याचा आवाज ऐकण्याचीही या सक्तीच्या सत्याची तयारी नसते.

अत्याचार व हिंसाचार यांच्याशी जवळीक साधून स्वतःचा गाभा घडवणारं सत्य अंतरात्म्याच्या भाषेचा आदर करण्याची शक्यताच नसते. त्यामुळे अशा अवकाशात मोहनदास करमचंद गांधींना जागा नाही. गांधींच्या दृष्टीने 'स्व'शी संवाद साधून नैतिक शुद्धतेद्वारे सत्य प्राप्त होतं. हे सत्य स्वतःला कठोर प्रश्न विचारतं.

परंतु, सक्तीच्या सत्यामध्ये मात्र मनोव्यापारांना स्थान नसतं, या सत्यामध्ये सध्याचं द्वेषाचं राजकारण सोयीचं असतं, त्यामुळे यात भीमराव रामजी आंबेडकरांनाही जागा नाही. कोणत्याही यादृच्छिक दाव्यांशी लढू शकतील अशा कणखर व बहुधा निर्णायक युक्तिवादांची निर्मिती करणाऱ्या सक्षम व पारदर्शक वादचर्चांवर आंबेडकरांची सत्याची संकल्पना आधारलेली होती, असं विवाद्यरित्या म्हणता येईल. गांधींच्या दृष्टीने स्वातंत्र्य आणि अंतरात्म्याची सत्त यांचा संयोग होतो. तर आंबेडकरांच्या दृष्टीने, स्वातंत्र्य व मन यांचा संयोग होतो. या संयोगाचा सौम्य आविष्कार गांधी व आंबेडकर या दोघांनीही स्वीकारलेल्या सत्याग्रहाच्या सिद्धान्तामध्ये आणि व्यवहारामध्ये झालेला आहे. या विचारकांना संवाद आणि वादचर्चा सर्वांत महत्त्वाच्या वाटत असत. अशा प्रक्रियेमधून संदेशनाद्वारे सत्य- उदाहरणार्थ, जातीचं सत्य- सार्वजनिकरित्या स्पष्ट होत जातं.

खरं म्हणजे अशा सनातन प्रश्नांना एकतर्फी नकारातून दूर सारता येत नाही, तर पारदर्शक वादचर्चेच्या मदतीने या प्रश्नांना सामोरं जाऊनच त्यांच्या पलीकडे जाता येतं. ही वादचर्चा केवळ अकादमिकविश्वापुरती मर्यादित असून भागत नाही, तर अनुभवजन्य पातळीला सर्वसामान्य लोकांमध्ये ही चर्चा घडून यावी लागते. विविध कळीच्या प्रश्नांचं सत्य इथे, म्हणजे लोकांच्या जातीय/लिंगभावात्मक व्यवहारांमध्ये, राहात असतं, त्यामुळे चर्चेची व्यापकता आवश्यक असते. बुद्धिजीवी लोक हे सत्य सत्तेला सांगण्याचा प्रयत्न करतात आणि या प्रश्नांमध्ये अडकलेल्यांना त्याची आठवण करून देऊ पाहतात. सत्य सांगण्याची क्रिया केवळ पोकळ विधानबाजीपुरती मर्यादित असल्याचं न मानणाऱ्या अशा बुद्धिजीवींबाबत आपण वाजवी भूमिका अंगिकारायला हवी. हे बुद्धिजीवी समतेसारख्या मूल्यांच्या बाजूने सवयीने बोलत असतात, किंबहुना त्यांच्या अंतर्गत निकडीमुळे त्यांना हे बोलणं भाग पडतं. या निकडीमुळेच ते स्वातंत्र्य व सत्त यांसारख्या नैतिक संसाधनांवर ताबा ठेवतात. बुद्धिजीवी हे विचारी लोकांच्या सोबत विचार करत असतात, म्हणून त्यांची भूमिका महत्त्वाची असते. लोकांमधील विखंडित जाणिवांचे विविध स्तर जोडण्यासाठीचा पूल तयार करता येईल, अशी परिस्थिती उलगडण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. या संकल्पनात्मक कारणांसाठी बुद्धिजीवींना सत्य बोलण्याचं स्वातंत्र्य गरजेचं असतं- लोकांमधील संवाद व संभाषण कोलमडून पडल्याचं सत्यही त्यांनी बोलता यायला हवं. नेत्यांच्या भाषणांची पडताळणी अभावानेच केली जाते. लोकांनी एकमेकांशी नियमितपणे संवाद साधायला हवा आणि अधिक चांगल्या मानवी अस्तित्त्वासाठी आवश्यक असलेलं ऐक्य उभारण्याकरिता चिकित्सक राजकीय निवडबुद्धी घडवायला हवी, तिला दृढ करायला हवी, त्यासाठीच्या विचारविनिमय प्रक्रियेमध्ये सामूहिकरित्या सहभागी व्हायला हवं. ●


**परिवर्तनाचा वाटसरू मिळण्याची ठिकाणे**

**पूजा ग्रंथ वितरण** द्वारा संभाजी वाघमारे, बी. रघुनाथ हॉल, वसमत रोड, परभणी भ्र. ९८६०९८५६५२

**हरिष बुक स्टॉल** न्यू बस स्टँड, अकोला भ्र. ९८२२२३३२६४

**अथर्व पब्लिकेशन्स** तळमजला, ओम हॉस्पिटल, अँग्लो उर्दू हायस्कूलजवळ, दत्त कॉलनी, जळगाव-४२५००१ दू. ०२५७-२२३९६६६

**मीडिया ॲडस्** द्वारा राहूल वाघमारे, विष्णू कॉम्प्लेक्स, हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड भ्र. ९८६००८३१३४

# आणखी एक ‘संस्थात्मक हत्या’

*उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात सामाजिक भेदभावाकडे संस्थात्मक पातळीवरून दुर्लक्ष केलं जातं, त्याचीच निष्पत्ती म्हणून पायल तडवीचा मृत्यू झाला.*

मुंबईतील बीवायएल नायर रुग्णालयामधील २६ वर्षीय निवासी डॉक्टर पायल तडवी यांच्या मृत्यूमुळे वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अनुसूचित जातीय (शेड्युल्ड कास्ट- एससी)/ अनुसूचित जमातीय (शेड्युल्ड ट्राइब- एसटी) विद्यार्थ्यांना सहन कराव्या लागणाऱ्या भेदभावाचं आणि जातीयवादाचं कपटी स्वरूप पुन्हा एकदा उघड झालं आहे. तडवी भिल्ल मुस्लीम समुदायातील होती. हा समुदाय एसटी गटामध्ये येतो. बीवायएल नायर रुग्णालयाशी संलग्न टोपीवाला नॅशनल मेडिकल (टीएनएम) महाविद्यालयातील तीन वरिष्ठ निवासी डॉक्टरांकडून पायलचा छळ होत होता, अशी माहिती बाहेर आली आहे. कथितरित्या या छळामुळेच पायलने आत्महत्येचे पाऊल उचललं. तिला ‘जातिवाचक’ टोमणे मारले जात होते आणि अवाजवी कानउपटणी केली जात होती, अशा औपचारिक तक्रारी पायलच्या कुटुंबीयांनी महाविद्यालयाच्या प्रशासनाकडे केल्या होत्या, परंतु त्याचा काही परिणाम झाला नाही.

पायलच्या मृत्यूनंतर संस्थात्मक यंत्रणेला जाग आली आणि त्यांनी संबंधित तीन डॉक्टरांना व पायलच्या युनिट प्रमुखाला निलंबित केलं. त्यानंतर रॅगिंगविरोधी समितीने तपास सुरू केला. पायल तडवीच्या मृत्यूनंतर आठवड्याभराने समितीच्या असं निदर्शनास आलं की, तिचा खरोखरच ‘टोकाचा छळ’ झाला होता, एसटी समुदायातील असल्याबद्दल व एससी/एसटी राखीव जागेतून महाविद्यालयात प्रवेश घेतल्याबद्दल तिला बरेच टोमणे मारले जात होते आणि तिला भेदभावाची वागणूक दिली जात होती. तिच्या मृत्यूनंतर एससी/ एसटी समुदायांमधील अनेक डॉक्टर पुढे आले आणि त्यांना वैद्यकीय महाविद्यालयात असताना सहन कराव्या लागलेल्या भेदभावांचे अनुभव नोंदवू लागले.

हे सर्व घडत असतानाही इंडियन मेडिकल असोसिएशनच्या प्रतिनिधींच्या मते मात्र वैद्यकीय क्षेत्रात जातिआधारित भेदभाव अजिबात अस्तित्त्वात नाही, किंवा जातिआधारित भेदभावाची पातळी लक्ष देण्याइतकी नाही. वास्तविक, देशामधील वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये उच्चदबावाखालील वातावरणात आणि इतर उच्चशिक्षण संस्थांमध्येही उच्चजातीय विद्यार्थ्यांकडून व शिक्षकवर्गाकडून जातिआधारित भेदभाव केला जाणं व संताप व्यक्त होणं सर्रास आढळतं. देशातील प्रमुख वैद्यकीय महाविद्यालय असलेल्या ‘एम्स’मध्ये जातिआधारित भेदभाव किती बोकाळला आहे व तो किती विविध रूपांमध्ये आढळतो, याचा तपशील थोरात समितीने २००७ साली सादर केलेल्या अहवालामध्ये नोंदवलेला आहे. सदर अहवाल प्रकाशात आल्याला दहा वर्षांहून अधिक काळ उलटला आहे, परंतु त्यातून कोणतेही धडे घेण्यात आलेले नाहीत आणि जातिआधारित भेदभावाकडे संस्थात्मक पातळीवरून होणारं दुर्लक्ष अजूनही शिक्षणसंस्थांना ग्रसून आहे, हे पायल तडवीच्या मृत्यूमुळे पुन्हा एकदा प्रकाशात आलं.

अशा संस्थांमधील कामकाजाचं स्वरूप, रचना आणि सत्तेचं केंद्रीकरण यांतूनही संस्थात्मक उदासीनतेची आणखी एक बाजू पाहायला मिळते. वरिष्ठ विद्यार्थ्यांकडून रॅगिंग व छळ केला जाण्याच्या घटनांना ही रचना पूरकता देते, किंबहुना प्रोत्साहनही देते. विद्यार्थ्यांचा व कनिष्ठांचा छळ होण्याचे प्रकार अभ्यासक्रमातील समकक्ष भाग म्हणूनच येतात आणि अशा संस्थांमध्ये या प्रकारांविरोधात कोणतीही

शिक्षासुद्धा दिली जात नाही, त्यामुळे मानवी वर्तन हीन पातळीवर जाण्यासाठीचा विचार व पर्यावरण सत्तरचनांमधून कसं निर्माण होतं व ते कसं टिकवलं जातं, याचा दाखलाच यातून मिळतो. २०१३ ते २०१७ या काळात विद्यापीठ अनुदान आयोगाकडे विद्यार्थ्यांचं रॅगिंग झाल्याच्या ३,०२२ तक्रारी दाखल झाल्या होत्या. शिवाय, नोंदवल्या न गेलेल्या अथवा सार्वजनिकरित्या प्रकाशात न आलेल्याही अनेक घटना असणार. आयोगाने प्रकाशित केलेल्या एका अहवालानुसार, महाविद्यालयात वरिष्ठांकडून रॅगिंग सहन करावं लागल्यास ८४.३ टक्के विद्यार्थी तक्रार दाखल करत नाहीत. महाविद्यालयाचं प्रशासन आपल्या तक्रारीची तड लावेल हा विश्वास पीडित विद्यार्थ्यांना नसतो आणि स्वतःच्या कारकीर्दीला बाधा येईल, आवारात बहिष्कार घातला जाईल व वरिष्ठांकडून मारहाण सहन करावी लागेल, अशी भीतीही त्यांना वाटते, काही काही कारणं तक्रार दाखल न होण्यामागे सक्रिय असतात.

शिवाय, आपण एससी/एसटी समुदायातील आहोत आणि आपण राखीव जागेतून प्रवेश मिळवला आहे हे उघड होण्याची भीतीही विद्यार्थ्यांना वाटते, त्यामुळे तक्रार दाखल करण्यापासून पीडित विद्यार्थी परावृत्त होतात. विशेषतः उच्चजातीय विद्यार्थी व शिक्षकवर्गाच्या संतापाच्या संदर्भात ही भीती जास्त असते. पायल व तिच्या पालकांनी महाविद्यालयीन प्रशासनाकडे अनेकदा तक्रार केली होती, पण त्याची साधी दखलही घेण्यात आली नाही, मग कारवाई होण्याची तर बातच दूर. किंबहुना, टीएनएम महाविद्यालयातील रॅगिंगविरोधी समितीची बैठकही गेल्या दीड वर्षात झालेली नाही, असं समोर आलं आहे. पायलच्या कुटुंबियांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी महाविद्यालयाकडे तक्रार केल्यानंतर तिचा छळ आणखी वाढला. अशा तक्रारींकडे गांभीर्याने लक्ष दिलं जात नाही आणि संबंधित संस्था निष्क्रिय राहातात, त्यामुळे एससी/एसटी विद्यार्थी तक्रार नोंदवण्यापासून आणखी परावृत्त होतात. अनेक जण मूकपणे छळ सहन करत राहातात, महाविद्यालय सोडून देतात, किंवा टोकाच्या प्रसंगांमध्ये स्वतःचं जीवन संपवण्याचाही मार्ग स्वीकारतात. त्यामुळे उच्चशिक्षणात आधीच विरळ असलेलं एससी/एसटी विद्यार्थ्यांचं प्रतिनिधित्व आणखी खालावतं. एससी/एसटी समुदायांचं पुरेसं प्रतिनिधित्व महाविद्यालयीन प्रशासनात व शिक्षकवर्गामध्ये नसेल किंवा जातिआधारित भेदभावाविषयी ते संवेदनशील नसतील वा असा भेदभाव जाणण्याची क्षमता त्यांच्यात नसेल, तर भेदभावाला व छळाविषयीच्या तक्रारींना क्षुल्लक मानण्याचे प्रकार सुरूच राहातील. पायल तडवीच्या प्रकरणात हेच झालं.

हैदराबाद विद्यापीठात पीएच.डी. करणारा दलित विद्यार्थी रोहित वेमुला याच्या मृत्यूची आठवण या संदर्भात होते. त्याच्या आत्महत्येला 'संस्थात्मक हत्या' असं संबोधण्यात आलं होतं. रोहितचा मृत्यू व त्यानंतरच्या घटनांमुळे 'रोहित अधिनियम' असा कायदा करण्याची मागणी झाली– सीमान्त समुदायांमधील विद्यार्थ्यांच्या रक्षणासाठीचा हा कायदा असावा. परंतु, संस्थांनी व तिथल्या लोकांनी सामाजिक भेदभावाचं संकट ओळखलं व त्याची दखल घेतली, तरच असा कायदा परिणामकारक ठरेल. अगदी 'निरुपद्रवी' रॅगिंगपासून ते 'टोकाच्या छळा'पर्यंत भेदभावाचं वर्तन व्यक्तीच्या मानवाधिकारांवर हल्ला करणारं आणि हिंसक असतं. अशा घटनांमुळे पीडित व्यक्तींना प्रतिष्ठेने जगण्यापासून व शिक्षण प्राप्त करण्यापासून प्रतिबंध केला जातो. या परिस्थितीची दखल घेतली, तरच पायल तडवी, रोहित वेमुला आणि मूकपणे अत्याचार सहन करणाऱ्या हजारो विद्यार्थ्यांना न्याय मिळण्याच्या दिशेने पावलं उचलली जातील. ●

# निराशेच्या विरोधात

*निवडणुकीतील पराभवाला प्रतिसाद देत असताना घसरणीचा रस्ता विरोधकांनी कसा टाळावा?*

भारतीय जनता पक्ष (भाजप) आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) यांना निवडणुकीत मिळालेला विजय प्रमाणाच्या संदर्भात आणि मताधिक्याच्या संदर्भातही नेत्रदीपक ठरणारा आहे. परंतु, यावर झटपट किंवा टोकाची प्रतिक्रिया देणं टाळायला हवं, कारण त्यातून गंभीर विश्लेषणाला फाटा मिळू शकतो. काहीही झालं तरी असं विश्लेषण घाईगडबडीत करता येणार नाही. किंबहुना, या निवडणुकांच्या निकालांचा विचार शांतपणे आत्मचिंतनाद्वारे करायला हवा, अशी मागणी करणाऱ्या समावेशक लोकशाहीमधील हितसंबंधी घटकांनी हे विश्लेषण करायला हवं. परंतु, पंतप्रधान नरेंद्र मोदी/भाजप यांच्या समर्थकांमध्ये उन्मादसदृश उत्साह दिसतो आणि विरोधकांमध्ये बऱ्याच प्रमाणात निराशा दाटून आलेली दिसते. विजय प्राप्त करताना रालोआला संसाधनांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करता आला, या पार्श्वभूमीवर विरोधकांमध्ये निराशा का निर्माण झाली याचा विचार करताना आसपासच्या परिस्थितीवर आपण लक्ष केंद्रित करायला हवं. लोकशाहीच्या जिवंतपणासाठी विरोधकांचं कणखर आरोग्य अत्यंत महत्त्वाचं असतं, या आदर्शलक्ष्यी कारणासाठीही निवणुकीनंतरच्या विरोधकांच्या अवस्थेकडे लक्ष देणं गरजेचं ठरतं.

ही निराशा विविध रूपांमध्ये आविष्कृत झालेली दिसते. ढोंगी सात्त्विक टीका, त्यातून दिले जाणारे सल्ले आणि दोषारोपांच्या फैरी यांमधून विरोधी गटातील निराशा दिसून येते. भाजपच्या पारंपरिक बालेकिल्ल्यांना धक्का देण्यात विरोधी पक्षांना-विशेषतः काँग्रेसला सपशेल अपयश आलं, हे खरंच आहे. २०१४ सालापासून भाजपशी थेट मुकाबला झालेल्या किती जागा काँग्रेसने गमावल्या, ही संख्या पाहिली तरी या अपयशाचा दाखला मिळतो. अलीकडेच मध्य भारतातील तीन राज्यांमध्ये झालेल्या राज्यस्तरीय निवडणुकांमधील कामगिरीचा आधार घेऊन पुढे जाणं काँग्रेसला शक्य झालं नाही. कर्नाटक, महाराष्ट्र व अमेठी इथले बालेकिल्लेही या पक्षाला टिकवता आले नाहीत. चिंता वाटावी अशी या पक्षाची गंभीर अवस्था झाली आहे. ही कमजोर कामगिरी लोकशाहीच्या दृष्टीनेही चिंताजनक आहे, कारण सदर राज्यांमध्ये काँग्रेसेतर विरोधी पर्याय उपलब्ध नाही. विरोधकांमधील ऐक्याच्या अभावावर आणि त्या संदर्भातील काँग्रेसच्या भूमिकेवरही टीका करणं शक्य आहे, परंतु उत्तर प्रदेश व बिहार इथे महागठबंधनसारख्या पक्षयुतींना सामाजिक आघाडी वा खंड तयार करण्यात अपयश आलं, हे निकालांवरून लख्ख झालेलं आहे.

उत्तर व दक्षिण भारतामधील भाजपच्या कामगिरीत तफावत आहे, याकडे निर्देश करून स्वतःचं कसंबसं समाधान करून घेणं, हे खरं तर स्वतःची फसगत करून घेण्यासारखंच आहे. कर्नाटकात भाजपने सफाईदार कामगिरी केली आणि पश्चिम बंगाल व तेलंगणा यांसह काही राज्यांमध्ये त्यांनी नवीन प्रदेश पादाक्रांत केले, हीसुद्धा वस्तुस्थिती आहे. पण त्याहून महत्त्वाचं म्हणजे एकाधिकारशाही बहुसंख्याकवादाला पर्याय उभा करण्यात प्रादेशिकतावादाला रचनात्मक मर्यादा येतात, ही बाबही इथे विचारात घ्यायला हवी. भाजपेतर किंवा रालोआबाहेरच्या पक्षांना मिळालेल्या एकूण मतांची संख्या कशी जास्त आहे, यामध्ये समाधान मानण्याचे प्रकारही टाळणं आवश्यक आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये ३१ टक्के विरुद्ध ६९ टक्के अशी तुलनात्मक आकडेवारी वारंवार उद्धृत केली जात होती. मताधिक्य मिळणारा उमेदवार

विजयी होतो, अशा निवडणुकीय व्यवस्थेतील वास्तवाला सामोरं जाण्यास नकार देणारी ही वृत्ती आहे. शिवाय, भाजपच्या राजकीय कथनाला लोकपातळीवर लाभलेली वैधताही अशा तुलनात्मक वक्तव्यांमध्ये दुर्लक्षिली जाते. प्रतिवैधता उभारण्यातील समस्या लक्षात घेण्याऐवजी राजकारणाचं गणिती आकलन मांडत बसण्यातच ही मंडळी धन्यता मानतात.

आत्मताडन करणाऱ्या प्रवृत्ती आणि त्याच्या दुसऱ्या टोकाला जाऊन जनतेच्या चारित्र्याबद्दल अंतिम निवाडे करणारी प्रवृत्ती, या दोन्हींपासून विरोधकांनी स्वतःचा बचाव करायला हवा. यातील पहिली प्रवृत्ती जवळ केल्यास भाजपला मिळालेल्या होकारात्मक मतांची व्याप्ती लक्षात येत नाही. पन्नास टक्क्यांच्या आसपास किंवा त्याहून अधिक मतं भाजपला मिळाली अशा राज्यांची संख्या पाहिली तरी हा मुद्दा स्पष्ट होतो. विशेषतः मध्य भारतीय राज्यांमधील भाजपच्या विजयातील मताधिक्य प्रचंड आहे. निवडणुकीची रीत न वापरता आणि संघ परिवाराच्या राजकीय विचारसरणीचं पाठबळ न घेता सत्तधारी पक्ष बनण्याची भाजपची छुपी रचना स्वीकारली गेल्याचं यावरून सकृत्दर्शनी वाटतं. परंतु, लोक संघ परिवाराच्या विळख्यात अडकले आहेत, असा ठपका ठेवणारा तत्काळ निवाडा करण्यासाठी सदर निरीक्षण वापरणं योग्य नाही. अशा प्रकारच्या दोषारोपांमुळे राजकीय कृतिशीलतेतून माघार घेतली जाते आणि सत्तहीन सत्याचं गौरवीकरण करण्याचा धोकादायक मार्ग पत्करला जातो. विरोधकांनी अशा पराभूत गौरवीकरणात रमण्याचं ठरवलं तर सत्यामागे लोकांची सत्त उभी करण्याच्या कार्यालाच बाधा येते. राजकारणामध्ये जनता आपोआप उपलब्ध नसते तर ती घडवली जाते, याकडे दुर्लक्ष केले जाऊ नये. किंबहुना, राजकारणात जनता घडवणं हे एक कामच असतं. नवीन जनतेची निवड करण्याचा पर्याय कधीच अस्तित्त्वात नसतो, त्यामुळे विरोधी शक्तींनी उपलब्ध लोकांमधून जनतेला किंवा प्रतिजनतेला एकत्र आणायला हवं, त्यात मग भाजप/ रालोआ यांना मत दिलेल्या मोठ्या घटकाचाही समावेश असेल.

भाजपचा राजकीय कार्यक्रम व त्याचं सामाजिक चारित्र्य लक्षात घेता त्यांनी रचलेली लोकेच्छा ही भारतीय समाजात कोणत्या ना कोणत्या रूपात आधीपासूनच अस्तित्त्वात होती, ती एकसंध रूपात नसली तरी बेढब रूपात पसरलेली होती. अशी तुलनेने सुपीक भूमी उपलब्ध असल्याचा फायदा भाजपला होऊ शकतो. दुसऱ्या बाजूला, विरोधकांच्या (न्याय्यता व सौहार्द या संकल्पनांभोवती) आदर्शलक्ष्यी कार्यक्रमाला राजकीय वैधता मिळवून देण्यासाठी राजकीय भूमीची मशागत गरजेची आहे. विरोधकांना हे कार्य पार पाडायचं असेल, तर आधी ढोंगी सात्त्विकता, स्वतःची फसगत आणि आत्मताडन अशा प्रवृत्तींवर मात करणं निकडीचं आहे. ●

## मतदान संपल्यावर सट्टेबाजी सुरू!

*बाजारपेठांचं प्रेम स्थैर्यासोबतच अधिसत्तेवरही असतं.*

निर्देशांकाने पहिल्यांदाच ४०,०००चा हवाहवासा वाटणारा आकडा पार केला आहे. हे स्वप्न वास्तवात येण्यासाठीचं पहिलं पाऊल २० मे रोजी पडलं. निकालपूर्व चाचण्यांची त्या दिवशी घोषणा झाली. विपरित जागतिक आर्थिक व व्यापारी पूर्वअंदाजांमुळे तुलनेने कमी पायाभूत अंकावर सुरुवात होऊनही ही वाढ नेत्रदीपक आहे. परंतु, भारतीय रिझर्व बँकेने ६ जून रोजी दरामध्ये कपात जाहीर केल्यावर बाजारपेठ

४०० अंकांनी कोसळली.

एवढी घट होऊनही पुन्हा निर्देशांकाने उसळी घेतली, याचा अर्थ निकालपूर्व चाचण्यांचा शेअर बाजारावर खूप जास्त प्रभाव पडतो, तितका प्रभाव राष्ट्रीय लोकशाही आघाडी किंवा संयुक्त पुरोगामी आघाडीचा दुसरा कार्यकाळ यांमधील मुख्य धोरणात्मक घोषणांचाही पडला नव्हता. असं का? शेअर बाजारातील घडामोडी दोन घटकांवर अवलंबून असतात : ज्या कंपन्यांचे समभाग विक्रीला असतात त्यांची दीर्घकालीन मूलभूत तत्त्वे आणि व्यवस्थेला अचानकपणे मिळणारे धक्के. आत्ताच्या घडामोडीकडे बघण्याचा उपयुक्त मार्ग म्हणून, किन्सच्या मांडणीनुसार, या वाढीचा कोणता भाग अनुमानात्मक आहे (लघुकालीन लाभ) आणि कोणता भाग उद्यमशीलतेशी संबंधित आहे (मूलभूत तत्त्वे) ते पाहायला हवं. यातील पहिल्या घटकावर जास्त भर दिलेला दिसला, तर बाजारपेठांचे अतिरिक्त मूल्यांकन झाल्याचं म्हणता येतं आणि त्यावर दुरुस्ती करणं गरजेचं ठरतं. तर दुसऱ्या घटकाच्या संदर्भात असं म्हणता येईल की, सध्याचं किंमत-उत्पन्न गुणोत्तर जास्त असलं तरी अर्थव्यवस्थेच्या भवितव्याविषयी चांगल्या अपेक्षांवर ते आधारलेलं आहे. गहू (उद्यमशीलता) आणि भुसकट (अनुमान) यांच्यात फरक करणं अवघड असतं, कारण आज जे भुसकट वाटतं (वाढलेल्या किंमत-उत्पन्न गुणोत्तरामुळे अतिरिक्त मूल्यांकन झालेली बाजारपेठ) ते प्रत्यक्षात तसं असेलच असं नाही, कारण ते अपेक्षित उत्पन्नावर आधारलेलं असू शकतं, आणि हे कदाचित खरं निघण्याची शक्यता असते. गेल्या काही आठवड्यांमध्ये हे मुद्दे कसे समोर आले?

एक, जवळपास सर्व निकालपूर्व चाचण्यांमध्ये नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारला सहज बहुमत मिळेल, असे अंदाज वर्तवण्यात आले, ही बाब एक कळीचा लघुकालीन घटक ठरली आणि त्यातून एका दिवसात उच्चांक गाठण्याला मोठा हातभार लागला, हे उघड आहे. दोन, हा मुद्दा पहिल्याशी संबंधित असला तरी अधिक दीर्घकालीन दृष्टीचा आहे- बहुमतातील सरकार अपेक्षेनुसार व्यवसायाचं वातावरण पुरवण्याची शक्यता असते, त्यासाठीचं राजकीय स्थैर्य यातून मिळतं, हे गुंतवणूकदारांना दीर्घकालीन दृष्टीने महत्त्वाचं वाटतं. पण ही अपेक्षा पुरेशी नाही. विशेषतः पहिल्या कार्यकाळामध्ये आर्थिक आघाडीवर फारशी चांगली कामगिरी करू न शकलेल्या विद्यमान सरकारच्या बाबतीत तर ही अपेक्षा विशेषत्वाने अपुरी ठरते. अकार्यक्षम सरकार पुन्हा सत्तेत येणं हे गुंतवणूकदारांना त्यांचा पैसा ओतण्याच्या दृष्टीने चांगलं लक्षण ठरत नाही. मग तरीही त्यांनी पैसा का ओतला? लोकांचा संपूर्ण विश्वास असल्यासारखं वाटणारा पंतप्रधान मोदींसारखा 'सामर्थ्यवान' नेता निर्णायक पावलं उचलू शकतो, त्यामुळे राजकीयदृष्ट्या अवघड पण बाजारपेठस्नेही आर्थिक सुधारणांच्या बाबतीत त्याच्याकडून कंपन्यांना खूप जास्त आशा राहाते. सरकारी क्षेत्रातील कंपन्यांची निर्गुंतवणूक व श्रम बाजारपेठेमधील सुधारणा, अशी काही पावलं मोदींनी त्यांच्या दुसऱ्या कार्यकाळात उचलावीत, अशी अपेक्षा बड्या कंपन्यांची राहील. गतकाळात प्रचंड लोकविरोधी ठरलेल्या निश्चलनीकरणासारख्या योजनेनंतरही मोदी तग धरून राहिले, हे विचारात घेता बाजारपेठांची अपेक्षा चुकीचीही ठरणार नाही.

तीन, भारतीय अर्थव्यवस्थेच्या तात्कालिक कामगिरीविषयीच्या अपेक्षांचीही महत्त्वाची भूमिका होती. भारत ही जगातील एक सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याचा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणे निधीने व्यक्त केला, त्याचीही जोड याला आहे. हे आश्चर्यकारक आहे, कारण गेल्या तिमाहीमध्ये अर्थव्यवस्थेची कामगिरी तितकीशी चांगली नव्हती. बहुधा फारशा चांगल्या नसलेल्या गतकाळापेक्षा संदिग्ध भविष्यावर गुंतवणूकदारांनी आशा लावून ठेवली असावी. तेलाच्या कमी किंमतींमुळे तात्कालिक

पातळीवर सोयीस्कर आर्थिक धोरणाविषयीच्या अपेक्षा वाढल्या असण्याची शक्यता आहे. सामान्य परिस्थितीत रोख्यांवर कमी परतावा मिळत असेल तर समभाग विकत घेणं अधिक लाभदायक ठरतं. कमी व्याज दरामुळे कॉर्पोरेट आणि/किंवा कौटुंबिक गुंतवणुकीला सुरुवात होण्याची शक्यता आहे, त्यातून अर्थव्यवस्थेचीही वाढ होईल, अशी अपेक्षा होती. रिझर्व बँकेने संमिश्र संकेत दिले आहेत. व्याज दरांमध्ये घट करताना बँकेने वृद्धीच्या अपेक्षित दरात काही सुधारणा केल्या. त्याच वेळी बँकिंगबाह्य वित्तीय कंपन्यांना रोकडसुलभतेचा अभाव जाणवत होता, त्यावर मात्र कोणताही थेट उपाय करण्यात आला नाही.

चार, २०१९ सालामध्ये आत्तापर्यंत 'परकीय पोर्टफोलिओ गुंतवणुकी'चा ओघ मोठ्या प्रमाणात वाहत येतो आहे. या निधीच्या स्रोताच्या ठिकाणी उत्पन्न झालेल्या काही ढकल घटकांमुळे (पुश फॅक्टर) हा प्रवाह अधिक जोमाने आला. चीन-अमेरिका व्यापारी युद्ध, अमेरिकेतील अर्थव्यवस्थेच्या सुधारणेची मंद गती, अमेरिकेचा रोखे परतावा कमी होईल यासाठी तिथल्या आर्थिक धोरणांना शिथील केलं जाण्याची अपेक्षा, असे काही घटक या संदर्भात कारणीभूत ठरले असावेत. यातील दुसऱ्या घटकामुळे शेअर बाजारातील खरेद-विक्री व्यवहारांच्या शक्यता वाढतात, परंतु विनिमय दराची जोखीम समन्यायाने वाढली नाही तर हे साधतं. ओढ घटकांच्या (पुल फॅक्टर) बाबतीत मुख्यत्वे देशांतर्गत गुंतवणूकदारांवर त्यांचा प्रभाव पडत असतो.

सट्टेबाजांचा अंदाज बरोबर असेल वा नसेल, पण एक गोष्ट स्पष्ट आहे : अल्पकालीन स्वरूपाचे व्यापक शेअर बाजारपेठेतील बदल हे जवळपास कायमच भुसकटासारखे असतात, याचा दाखला निकालपूर्व चाचण्यांमधून दिसला. परंतु, त्याहून निराळा मुद्दा विचारात घ्यायचा तर, ही खरोखरच अतिरिक्त मूल्यांकन झालेली बाजारपेठ असेल, तर कोणत्याही अर्थव्यवस्थेला- विशेषतः चंचल जागतिक पर्यावरणामध्ये अशी बाजारपेठ संकटकारक ठरेल. अतिरिक्त मूल्यांकनाचे धोके कमी करण्यासाठी किन्सविचाराचे समर्थक अनेकदा असा युक्तिवाद करतात की, या प्रक्रियेत लघुकालीन भांडवली लाभाचा कर मिळतो. त्याच वेळी धोरणांनी शेअर बाजारांना पूर्णतः नाउमेद करू नये, कारण अखंड भांडवलाच्या काही भागांचे खंड पाडण्यामध्ये आणि त्यातून गुंतवणुकीवरील जोखीम कमी करण्यामध्ये शेअर बाजारपेठेची भूमिका महत्त्वाची असते, त्यामुळे या बाजाराला पूर्णतः नाउमेद करणारी धोरणं असू नयेत. आदर्श स्थितीत सरकारने अर्थव्यवस्थेची कळ स्वतःच्या हातात ठेवायला हवी. व्याज दरात बदल करून कॉर्पोरेट वा कौटुंबिक गुंतवणुकीमध्ये अप्रत्यक्ष प्रभाव आणलेला आहे. दुर्दैवाने विद्यमान सरकारने अतिशय खालावलेल्या आर्थिक परिस्थितीमध्येही वित्तीय जबाबदाऱ्या व अर्थसंकल्प व्यवस्थापन अधिनियम यांना आधारभूत मानलं. यातून धोरणात्मक अवकाशावर गंभीर मर्यादा येतात आणि अर्थव्यवस्था शेअर बाजारातील घडामोडींची किंवा निर्णयकर्त्या कंपन्यांची अंकित बनते. या कंपन्या अर्थव्यवस्थेच्या भवितव्याशी अचूकरित्या जोडलेल्या असतीलच असं नाही. ●


## परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी ते सुवाच्य अक्षरात लिहिलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत. मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड फाँटमध्ये पाठवावे.

# ‘सहृदयी’ चलनवाढीचा बुडबुडा

*चलनवाढीचं व्यवस्थापन हे विधिमंडळीय अधिकारात असू नये, तर सर्वांगीण विकासात्मक उद्दिष्ट म्हणून त्याचा विचार व्हावा.*

निवडणुकीय विषयपत्रिकेमध्ये ‘चलनवाढ’ हा मुद्दाच नसलेली भारतातील पहिली निवडणूक म्हणून बहुधा २०१९ सालच्या सार्वत्रिक निवडणुकांकडे बोट दाखवता येईल. गेल्या पाच वर्षांमध्ये या देशातील चलनवाढीला- विशेषतः ‘हेडलाइन’ चलनवाढीच्या दराला लगाम घातला गेला आहे. २०१४ ते एप्रिल २०१८ या काळात वर्षागणिक चलनवाढीचा दर- ग्राहक दर किंमत निर्देशांकातील (कन्झ्युमर प्राइज इंडेक्स: सीपीआय) बदलाच्या दरानुसार काढलेला अंदाज- ६.६५ टक्क्यावरून २.४२ टक्क्यांपर्यंत वेगाने खाली आला. परंतु, चलनवाढीचा २ टक्के - ६ टक्के पल्ला ‘स्वीकारणीय’ ठरवणाऱ्या संकल्पनेमुळे या अंदाजांमधील संख्यांना वैधता प्राप्त झाली असण्याची संभाव्यता आहे. भारतीय रिझर्व बँकेच्या चलनवाढकेंद्री चौकटीद्वारे हा ‘स्वीकारणीय’ पल्ला उपलब्ध करून दिला जातो.

चलनवाढ व आर्थिक वृद्धी यांच्या संबंधांवरील स्थूलआर्थिक संभाषितामध्ये चलनवाढीच्या ‘तीव्रता पातळी’चं महत्त्व मान्य केलं जातं. तीव्रता पातळीच्या वरील चलनवाढ आर्थिक वृद्धीला बाधा पोचवते याविषयी एकमत आहे, परंतु कमी चलनवाढीच्या दराचा वृद्धीवर कोणता परिणाम होतो याचे अनुभवजन्य पुरावे संमिश्र आहेत- तरीही त्यात सकारात्मक किंवा कमी ठोस परिणामांचे दाखले जास्त आहेत. हे पुरावे आणि रिझर्व बँकेने मान्यता दिलेला चलनवाढीचा पल्ला यांचा विचार करता, भारतातील सीपीआयवर आधारित चलनवाढीमध्ये सध्या झालेली वाढ अजूनही रिझर्व बँकेच्या परिभाषेनुसार ‘सहृदयी’ मानता येईल (एप्रिल २०१९मध्ये ती पाच वर्षांमधील सर्वोच्च स्थानी म्हणजे २.९२ टक्क्यांवर होती). तीन महिन्यांच्या काळात सलगपणे रिझर्व बँकेने आपला धोरण दर सहा टक्क्यांवरून ५.७५ टक्क्यांपर्यंत खाली आणला. खाजगी गुंतवणूक व उपभोक्ता खर्चाला चालना देणं, हा यामागचा उद्देश होता, जेणेकरून सकल घरेलू उत्पन्नातील (ग्रॉस डोमेस्टिक प्रोडक्ट : जीडीपी) वाढीला नवसंजीवनी मिळेल. सध्या जीडीपी वाढ ५.८ टक्क्यांइतकी खाली आली आहे, ती २०१९-२०मध्ये निर्धारित ७ टक्क्यांपर्यंत जावी, यासाठी हे पाऊल उचलण्यात आले. परंतु, आर्थिक वृद्धीसंबंधीच्या अशा क्लृप्त्यांचा व्यापक सामाजिक-आर्थिक उद्देशांवर कोणता परिणाम होतो, याचा विचार करण्यात आला नाही.

आर्थिक उपलब्धीचे एकमेव मोजमाप म्हणून जीडीपीचा वापर करणं हे स्वतःच्या उपयुक्तता वाढीत गुंतलेल्या व्यक्तीची संकल्पना अधोरेखित करणारं आहे, त्यामध्ये सहानुभूती, सामाजिकता, सामाजिक वचनबद्धता व सामूहिक कृती यांसारखी मानवी वर्तनाची व प्रेरणेची काही महत्त्वाची क्षेत्रं दुर्लक्षिली जातात, हे गेल्या पाच दशकांमध्ये आर्थिक वाङ्मयातून वेळोवेळी नमूद करण्यात आलेलं आहे. जीडीपीला उत्तेजना देण्याची व्यूहरचना म्हणून चलनवाढीवर लक्ष केंद्रित करणं, हे यासारख्याच संकल्पनेवर आधारलेलं असण्याची शक्यता आहे. उदाहरणार्थ, गगनाला भिडलेल्या ग्राहक (अन्न) किंमतींचा मुद्दा भारतीय जनता पक्षाने (भाजप) २०१४ साली सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचारामध्ये उचलून धरला होता. भारतामध्ये ग्राहक बाजारपेठांवर वर्चस्व असलेल्या मध्यम वर्गाच्या निवडणुकीतील हेलकाव्यांचा मोठा हातभार भाजपच्या विजयाला लागला होता. परिणामी,

भाजप सरकारच्या चलनवाढ व्यवस्थापनामध्ये ग्राहक किंमती कमी करण्यासाठी पक्षपाती भूमिका राहिली. मग या भूमिकेमुळे उत्पादक किंमती खाली आल्या तरी त्याकडे दुर्लक्ष करण्यात आलं. शेती क्षेत्रामध्ये याचा विशेष अनुभव आला. दुसऱ्या बाजूला, मध्यम वर्गाने कधीही आपल्या शेतकरी सहजीवींच्या जीवनाशी व उपजीविकेशी संबंधित मुद्दे उचलून सामाजिक साहचर्य दाखवलेलं नाही.

या संदर्भात चलनवाढीच्या 'सहृदयते'ची मूळ संकल्पनाच उत्तेजक ठरणारी आहे, कारण चलनवाढीची विविध मोजमापं (उदाहरणार्थ, सीपीआय, घाऊक किंमत निर्देशांक (होलसेल प्राइज इंडेक्स : डब्ल्यूपीआय), किंवा जीडीपी डिफ्लेटर) आणि असंख्य सेवा व वस्तूंचं सापेक्ष किंमतविषयक वर्तन यांची प्रस्तुतता अर्थव्यवस्थेतील विविध घटकांसाठी भिन्न-भिन्न असते. त्यामुळे चलनवाढ दरावर लक्ष केंद्रित करण्याचा विधिमंडळीय अधिकार अलगाववाद अ ाच्या राजकारणाला पूरक ठरतो. त्यातून निवडणुकीय घटकांना 'लाभार्थी' ठरवून मतदारवर्गाच्या- विशेषतः मत संघटित करणाऱ्यांच्या- सारासार विचारशक्तीला गोंधळात टाकता येतं.

सांकल्पनिक दृष्टीने पाहिलं तर आर्थिक धोरणात्मक निर्णयांना मार्गदर्शन करण्यासाठी डब्ल्यूपीआयपेक्षा सीपीआय हा अधिक चांगला निर्देशक आहे, कारण त्यामध्ये किरकोळ क्षेत्रातील चलनवाढीची दखल घेतलेली असते. परंतु, तांत्रिकदृष्ट्या रिझर्व बँकेच्या चलनवाढकेंद्री यंत्रणेचा सीपीआयवर अत्यल्प परिणाम होतो. खाद्य व पेय यांचा संयुक्त अधिभार जवळपास ४६ टक्क्यांपर्यंत आहे. आणि भारतातील अन्न किंमतींची बहुतांश चलनवाढ/चलनघट ही मागणीच्या संदर्भातील समस्यांमुळे होते- उदाहरणार्थ, जागतिक बाजारपेठेतील कच्च्या तेलाच्या किंमतींमधील बदल आणि/किंवा देशांतर्गत पीक उत्पादनातील भिन्नता, असा समस्या याबाबतीत महत्त्वाच्या ठरतात; यावर रिझर्व बँकेचं फारसं नियंत्रण नसतं. या आर्थिक घटकांचा आधार घेऊन त्या-त्या वेळचं सरकार राजकीय हस्तक्षेप करतं- शेतकी वस्तूंच्या निर्यातीवर मर्यादा घालणं व समभागधारणेवर निर्बंध आणणं व जकातमुक्त आयात करणं यांसारखे पुरवठा व्यवस्थापनासाठी योजलेले उपाय यामध्ये असतात, त्याचप्रमाणे निश्चलनीकरण आणि वस्तू व सेवा कर यांसारख्या धोरणांद्वारे बाजारातील रोकडसुलभता व खरेदीदाराचा विश्वास बाजारपेठेमधून लुप्त होण्याच्या शक्यताही असतात.

ग्राहक किंमतींची सहृदयता हा योगायोगाचा भाग आहे, त्यामुळे चलनवाढीचा दर (रिझर्व बँकेच्या कायदेशीर अधिकारापुरता विचार केला तरी) ग्राहकांसाठी वाटतो तितका निरुपद्रवी असेल असं नाही. कारण- एक, हा दर अन्नपदार्थांच्या चलनवाढीवर अवलंबून असतो, याचं मोजमाप डब्ल्यूपीआयच्या संदर्भात केलं, तर ३३ महिन्यांमधील सर्वोच्च स्थान गाठत हा दर ७.४ टक्क्यांवर पोचला आहे. मुख्यत्वे महत्त्वाच्या अन्नपदार्थांच्या किंमतींमध्ये सलग वाढ झाल्यामुळे ही परिस्थिती ओढवली. वर्षागणिक डाळींची चलनवाढ १४ टक्क्यांच्या आसपास पोचली आहे, तर अन्नधान्यांची चलनवाढ ८.५ टक्के आहे. दोन, नैऋत्य मान्सूनच्या संदर्भात हवामान खातं फारसं आशावादी नाही, त्यामुळे उत्पादन कमी राहाण्याचा व किंमत आणखी वाढण्याचा धोका आहे. तीन, तेलाच्या किंमती सध्या प्रति बॅरल ६० डॉलर इतक्या खाली आहेत, आणि भूराजकीय अस्थिरतांमुळे त्या आणखी खाली जाण्याची शक्यता आहे, त्यातून अन्नपदार्थांच्या किंमतींवर उर्ध्वगतीचा दबाव येईल.

अन्नविषयक अर्थव्यवस्थेचं व्यवस्थापन राज्यसंस्था किती कुशलतेने करते, यावर अशा किंमतवाढीतून लाभ घेण्याची शेतकऱ्यांची क्षमता अवलंबून असेल. भाजपचं सरकार समावेशक विकासाच्या अवास्तव आश्वासनांपलीकडे जाऊन विकास व्यवस्थापनाविषयीचा सर्वांगीण दृष्टिकोन आचरणात आणेल का? की,

जीडीपीचं अकारण स्तोम माजवून त्या संदर्भात चलनवाढीवरच लक्ष केंद्रित करत राहील? ●

## ५-जी कहाणीचा शोध

*'हुवाई' कंपनीवर अमेरिकेने घातलेली बंदी बाजारपेठीय स्पर्धेमधील व्यूहरचना आहे की डिजीटल अवकाशांवरील राज्यसंस्थेच्या नियंत्रणाचं उदाहरण?*

आर्थिक एकीकरणाला ४० वर्षं झाल्यानंतर आता अमेरिका व चीन यांच्या विद्यमान राजकीय सरकारांच्या कार्यकाळात आर्थिक तणावाचा उत्कलन बिंदू गाठला गेला आहे. यांमध्ये दोन्ही देश कोणताही संयम दाखवायला तयार नाहीत. किंबहुना, वस्तू, भांडवल, लोक व तंत्रज्ञान या चारही क्षेत्रांमधील विघटनाचं समर्थन दोन्ही देशांमधील राजकीय नेते करत आहेत. वस्तूंचं विघटन जागतिक पुरवठा साखळीवर- विशेषतः संवेदनक्षम तंत्रज्ञानांच्या विकासावर ताण निर्माण करतं. अमेरिकी अर्थव्यवस्थेतील मोठ्या क्षेत्रांमध्ये चिनी गुंतवणुकीवर निर्बंध घातल्यामुळे आंतरदेशीय भांडवली प्रवाहांच्या एकीकरणाला धोका निर्माण झाला आहे. लोकांचं- विशेषतः तरुण चिनी विद्यार्थ्यांचं एकीकरण अमेरिकेच्या संभाव्य धोरणामुळे थोपवलं जाऊ शकतं- अमेरिकेतील विज्ञान व अभियांत्रिकीच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेण्यापासून त्यांना निर्बंध सहन करावे लागू शकतात. असा कल वाढत असताना, अमेरिका व चीन एकमेकांना वगळण्याचे प्रयत्न करत आहेत, त्यामुळे जागतिक अभिनवता परिसंस्थेच्या एकीकरणाला धोका उत्पन्न झाला आहे. अमेरिका व तिच्या मित्रदेशांनी (विशेषतः 'फाइव्ह आइज' आघाड्यांमधील देश) दूरसंचार क्षेत्रातील हुवाई या बलाढ्य चिनी कंपनीवर निर्बंध लादले आहेत, यावरून तंत्रज्ञानीय विघटनाचे संकेत मिळतात.

हाँगकाँगहून आयात केलेल्या टेलिफोन स्विचिंग गीअरची केवळ पुनर्विक्री करणारी कंपनी म्हणून हुवाईची सुरुवात १९८७ साली झाली. त्यानंतर १९९०च्या दशकाच्या अखेरीपासून मोबाइल फोनसाठी उच्च तंत्रज्ञानीय जाळं उभारणारे संच पुरवणारी आघाडीची जागतिक कंपनी म्हणून नोकिआ व एरिक्सन यांच्या सोबतीने हुवाईचा उदय झाला. पण मुख्यत्वे 'फिफ्थ जनरेशन' (५ जी) जाळ्याची तांत्रिक प्रमाणकं स्थापण्यात या कंपनीने दाखवलेली सक्रियता विशेष नावाजली गेली. जगभरात २०२५पर्यंत अपेक्षित असलेल्या एकूण ५-जी जोडण्यांपैकी जवळपास ३३ टक्के जोडण्या एकट्या चीनमध्ये झालेल्या असतील, असा अंदाज आहे. याउलट, अमेरिका व पाश्चात्त्य युरोपाचा एकूण वाटा सुमारे २५ टक्क्यांच्या आसपास असेल, असा अंदाज आहे. याचा अर्थ काय? चीन आणि हुवाईचं मूळ ठिकाणचं तंत्रज्ञान (२०१८ साली चीनमध्ये दाखल झालेल्या ५३,३४५ तंत्रज्ञानीय पेटन्टांपैकी १० टक्के पेटन्ट एकट्या याच कंपनीची होती) हे घटक भविष्यातील राष्ट्रीय पायाभूत रचनांना कळीचे ठरणार आहेत, असं जगभरातील सरकारांनी मान्य केलेलं आहे. 'डेलोइट'च्या आकडेवारीनुसार, २०१५ ते २०१८ या वर्षांमध्ये सेल साइट्सच्या संख्येबाबत चीनने अमेरिकेला किमान १२ पटींनी मागे टाकलेच, शिवाय ५-जी पायाभूत रचनांवर २४ अब्ज डॉलर अधिक खर्च केला.

स्पेक्ट्रमच्या बाबतीत ५-जी तंत्रज्ञान त्याच्या पूर्वसुरींहून अधिक सक्षम आहे. जास्त संख्येने संदेशन उपकरणांकडे कमी प्रसार-काळात (प्रोपगेशन लॅटन्सी) जास्त डेटा प्रक्षेपित करणं या तंत्रज्ञानामुळे शक्य होतं. पण प्रसार-काळ कमी करणं खर्चिक असतं. उदाहरणार्थ,

हिबर्निया एक्सप्रेसचं उदाहरण घेता येईल- लंडन व न्यूयॉर्क यांना जोडणाऱ्या अटलान्टिक महासागरामधून जाणारी तीन हजार मैलांची ही फायबर-ऑप्टिक लिंक हुवाईने हिबर्निया अटलान्टिकच्या सहाय्याने २०११ साली जोडायला सुरुवात केली. पाच मिलिसेकंद प्रसार-काळ वाचवण्यासाठी अंदाजे खर्च किमान ४० कोटी डॉलर इतका येतो, किंवा प्रत्येक बचत झालेल्या मिलिसेकंदामागे सुमारे आठ कोटी डॉलर खर्च होतात. आधीच्या दूरसंचार तंत्रज्ञानांप्रमाणे '५-जी'च्या बाबतीतही तंत्रज्ञानाच्या आरंभिक/नवजात टप्प्यामध्ये भांडवली खर्च बराच होतो. त्याच वेळी, सायबर उत्पादन व सेवांच्या विविधीकरणाद्वारे '५-जी' तंत्रज्ञान महसुलाचे नवीन प्रवाह निर्माण करेल, हे जवळपास सर्वांनी स्वीकारलं आहे. परंतु, वाहकाला यातील किती मूल्य पकडता येईल, हे अस्पष्ट आहे.

किंबहुना, गेल्या दशकामध्ये 'लाँग-टर्म इव्होल्यूशन' (एलटीई)/४-जी तंत्रज्ञानाची अंमलबजावणी झाली, त्यातून घेतलेले धडे लक्षात घेता वाहकांच्या जालीय गुंतवणुकींमधील प्रशंसनीय काटकसर स्पष्ट होते. विशेषतः अमेरिकेमध्ये हे अधिक ठळकपणे दिसतं. ४-जी तंत्रज्ञानाची अंमलबजावणी तिथेच झाली. वाहकांसाठी अभिप्रेत असलेले नवीन महसुलाचे लाभ निर्माण करण्याऐवजी एलटीई-द्वारे कार्यरत झालेल्या ॲप्लिकेशन्सद्वारे एक क्षमता-स्तर तयार झाला. असाधारण वेगाने वाढ झालेल्या माध्यम सेवा आणि दरामधील तीव्र स्पर्धेमुळे कमी झालेला प्रति वापरकर्ता सरासरी महसूल यांतून वाढलेल्या भांडवली गरजांना सामोरं जाण्यासाठी हा स्तर वाहकांना मदतीचा ठरला.

या संदर्भात, जाळं वाटून घेण्याची व्यूहरचना ५-जी अंमलबजावणीच्या दृष्टीने खर्च कमी करणारी ठरली असती. परंतु, अशा प्रकारच्या कोणत्याही रचनेबाबत अमेरिका व तिचे मित्रदेश साशंक असल्याचं दिसतं. घटत्या महसुलाला सामोरं जाताना आशियाई अर्थव्यवस्थांनी (दरविषयक) स्पर्धेमध्ये गतिमानता आणि जाळ्याची क्षमता यांना आधारभूत बनवलं आहे, यातून त्यांच्यात अंगभूत चिवटपणा निर्माण झाला, हे अमेरिका व संबंधितांच्या साशंकतेचं कारण आहे का? आर्थिक नेतृत्वाचा पाया मूल्य आणि डेटाचा नवीन वापर यांवर अवलंबून असेल, अशी धारणा व्यापक प्रमाणात तयार झाली आहे, त्यामुळे चीनच्या ५-जी जाळ्याचा घनता दर (प्रति १० चौरस मैल ५.३ साइट्स किंवा प्रति १०,००० लोकांमागे १४.१ साइट्स हा चीनमधील दर आहे, तर अमेरिकेमधे दर १० चौरस मैल ०.४ साइट्स आणि दर १०,००० लोकांमागे ४.७ साइट्स असा दर मिळतो) स्पर्धकांसाठी चिंतेचा विषय ठरल्यास त्यात काही नवल नाही.

जाळं अंमलबजावणी प्रक्रियांमधील अंगभूत घर्षण जागं ठेवून अमेरिका व तिचे मित्रदेश डिजीटल अवकाशामध्ये राज्यसंस्थेच्या हस्तक्षेपासाठी समर्थन उभं करण्याच्या प्रयत्नात आहेत. एका बाजूला, अंशदानासारखे संरक्षणात्मक हस्तक्षेप करून जागतिक बाजारपेठांमध्ये त्यांना दराच्या बाबतीत वरचष्मा राखता येऊ शकतो. पण, डिजीटल पायाभूत रचनांवरील नियंत्रणाला रचनात्मक मान्यता मिळाली की राज्यसंस्था खुलेपणाने सर्वव्यापी पाळत ठेवू शकते, ही अधिक अस्वस्थकारक बाब आहे. समकालीन राजकीय व्यवस्थांमधील विचारसरणीय संकटं या नियंत्रणामुळे आणखी पुसट होत जातात. चीनने सायबर सार्वभौमत्वाच्या बाजूने युक्तिवाद केला आहे आणि आंतरदेशीय डेटा प्रवाहावर उघड नियंत्रण ठेवण्याचा अधिकार राज्यसंस्थेला असतो अशी भूमिका घेतली आहे. तर, अमेरिका व युरोपीय संघ छुप्या पद्धतीने अशाच नियंत्रणाला पाठिंबा देत आहेत. अशा वेळी वास्तवातील त्यांच्या संबंधांचं स्वरूप कसं आहे : दीर्घकालीन वैरी की सामरिक स्पर्धक? ●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाऊंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (दि. १ व ८ जून २०१९ या अंकांतून. 'स्वातंत्र्य, सत्ता व सत्य' हे संपादकीय गोपाळ गुरू यांनी लिहिलेले आहे.)